Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 29/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## भारतीय वास्तववादी चित्रकार राजा रवि वर्मा

राजा रवि वर्मा हे भारताच्या त्रावणकोरच्या राजघराण्यातील एक चित्रकार होते. त्यांनी भारतीय साहित्य आणि संस्कृतीतील पात्रांची रंगीत चित्रे काढली. राजा रवि वर्मा यांनी काढलेल्या चित्रांनंतरच हिंदूंना आपले देव कसे दिसत असावेत ते समजले. राजा रवि वर्मा यांचा जन्म २९ एप्रिल १८४८ रोजी केरळमधील कोईल तंपुरन येतील किलिमनूर राजवाड्यात झाला. त्यांचे वडील मोठे विद्वान व आई कवयित्री होती. रवि वर्मा यांचे काका उत्तम चित्रकार होते. तिरुवनंतपुरमच्या राजदरबारी असणारे इंग्रज चित्रकार थी ओडेर जेन्सन, रामस्वामी नायडू यांच्या चित्रकारितेचा प्रभाव त्यांच्यावर पडला. ते त्रावणकोरचे राजचित्रकार बनले.

१८७३ मध्ये मद्रास येथील चित्रकलेच्या स्पर्धेत रवि वर्मा यांनी सुवर्णपदक मिळवले. राजा रवि वर्मा यांनी चित्रांतील विविध विषयांसाठी भारतभर प्रवास केला. त्याचे 'दुष्यंत व शकुन्तला', 'नल व दमयंती, या विषयावरील चित्रे प्रसिद्ध आहेत. ही त्यांची चित्रे सर्व भारतभर प्रसिद्ध झाली. आधुनिक भारतीय वास्तववादी चित्रकलेचा जनक म्हणून राजा रवि वर्मा यांचे नाव घेतले जाते. युरोपियन चित्रकारांप्रमाणे 'कमिशन पोट्रेट' काढणारे ते पहिले भारतीय चित्रकार. रामायण-महाभारतातील प्रसंग, विश्वामित्र-मेनका, दुष्यंत-शकुंतला, उर्वशी-पुरुरवा अशी एकापेक्षा एक सरस चित्रे आपल्या वास्तववादी शैलीच्या कलाकृतीतून त्यांनी चितारली. आपल्या चित्रांतून भारतीय संस्कृतीचा ठसा जगात उमटविणाऱ्या रवि वर्मा यांना अनेक मानसन्मान मिळाले. शिकागोच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात स्थान मिळवणारे ते एकमेव. सातव्या एडवर्डने 'कैसर-ए-हिंद' हा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले होते. अशा या महान चित्रकाराचे २ ऑक्टोबर १९०६ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 29, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401